**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८०/२०२०** **दिनांक ०६/१०/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२७५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३०/०९/२०२० ते ०६/१०/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०७/१०/२०२० सकाळी ८:३० पासून ११/१०/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/०९ | ०१/१० | ०२/१० | ०३/१० | ०४/१० | ०५/१० | ०६/१० | | ०७/१० | ०८/१० | ०९/१० | १०/१० | ११/१० |
| - | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | १२ | ६ | २ | ० | १२ |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३२ | ३३ | ३३ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २६ | २६ | २५ | २५ | २६ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ढगाळ | ढगाळ | अंशत: ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९२ | ८९ | ८७ | ८३ | ९२ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६७ | ६२ | ५८ | ५३ | ६७ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ३ | ३ | ४ | ३ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | द. | ई. | ई.पू. | आ.पू. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| **-** | **२८६४.२** | **५१९७.२** |

**हवामान सारांश**

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी दिनांक ७ ते ११ ऑक्टोबर, २०२० दरम्यान हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश ढगाळ राहील. |
| **पाऊसाचा विस्तारित श्रेणी अंदाज** | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक ९ ते १५ ऑक्टोबर, २०२० दरम्यान सरासरीइतक्या पाऊसाची शक्यता आहे. |

| पिक | अवस्था | हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **फुलोरा ते दाणे अवस्था (गरव्या जाती), दाणे भरणे अवस्था (निमगरव्या जाती) आणि पक्वता अवस्था (हळव्या जाती)** | • हवामान अंदाजानुसार हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या हळवे भाताची कापणी सकाळच्या वेळेस "वैभव" विळ्याने जमिनीलगत करावी. कापणी केलेल्या भाताची लगेच मळणी करून धान्य कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे.<br>• पिकाची कापणी जमिनीलगत करावी तसेच कापणीनंतर शेताची नांगरट करून धस्कटे काढून नष्ट करावीत. यामुळे पुढील हंगामात खोड किड आणि निळे भुंगेरे याचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल.<br>• गरवे आणि निम गरवे भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. नियंत्रित करावी.<br>• पाऊसाची उघडझाप आणि तापमानात वाढ संभवत असल्याने माळजमिनीवर असलेल्या हळव्या जातीच्या भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने तयार झालेल्या हळव्या भात पिकाची त्वरित कापणी करावी. तसेच भात कापणी नंतर जमिनीची खोल नांगरणी करावी त्यामुळे किडीचे सुप्तावस्थेतील कोष नष्ट होण्यास मदत होईल.<br>• लष्करी अळीचा प्रादुर्भाव निमगरव्या आणि गरव्या भात जातीवर वरही दिसून येण्याची शक्यता असल्याने पिकाचे चांगले निरीक्षण करावे. या किडीच्या अळ्या दिवसा फुटव्यात अथवा जमिनीत लपून राहतात आणि रात्री या किडीच्या अळ्या लोंब्या कुरतडतात, त्यामुळे दाणे जमिनीवर गळतात. किडीच्या नियंत्रणासाठी अंडीपुंज आणि अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात. निमगरव्या आणि गरव्या जातींवर प्रादुर्भाव दिसून येत असल्यास लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.(टीप: किटकनाशकास लेबल क्लेम नाहीत.).<br>• सकाळच्या वेळेस जास्त आर्द्रता असण्याची शक्यता असल्याने दुधाळ अवस्थेत असलेल्या गरव्या भात पिकावर लोंबीवरील ढेकण्याचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. भात पिक दुधाळ अवस्थेत असताना प्रौढ ढेकण्या व त्याची लहान पिल्ले दाण्याला छिद्र पाडून आतील रस शोषून घेतात. त्यामुळे दाणे पोचट राहतात आणि लोंब्या अर्धवट भरतात. अशा दाण्यावर एक सूक्ष्म छिद्र दिसून येते व छिद्राभोवती काळपट, तपकिरी ठिपका तयार होतो. पिक दुधाळ अवस्थेत असताना प्रति चूड एक ढेकण्या आढळून आल्यास नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ५ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही ९ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. (टीप: किटकनाशकास लेबल क्लेम नाहीत.). |
| **नागली (नाचणी)** | **दाणे भरणे ते पक्वता** | • हवामान अंदाजानुसार हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने कापणीस तयार झालेल्या हळव्या नागली पिकाची कणसे सकाळच्या वेळेस विळ्याने कापून कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे आणि वाळल्या नंतर मळणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • पाऊसाची उघडझाप आणि तापमानात वाढ संभवण्याची शक्यता असल्याने आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण असल्याने नवीन पालवीचे तुडतुडे आणि मिज माशीच्या प्रादुर्भावापासून संरक्षण करण्यासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही ९ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आंबा बागेतील गवत, रोगग्रस्त फांद्या काढून बागेची साफसफाई करावी आणि नंतर कीटकनाशकाची फवारणी घ्यावी.<br>• वाढते तापमान, पावसाळ्याच्या तुलनेने कमी होणारी आर्द्रता, जमिनीत उपलब्ध असलेला ओलावा जुन्या अनुत्पादित आणि घन लागवड केलेल्या आंबा कलमांची छाटणी करण्यास उत्तम आहे. घन लागवड (५ x ५ मी. किंवा ६ x ४ मी.) असलेल्या आंबा बागांमध्ये सुरुवातीच्या काळापासून नियमित छाटणी करावी. या मध्ये उंची कमी करणे, फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास छाटणे आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकणे या गोष्टींचा अंतर्भाव करावा. घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी.<br>• पारंपारिक पध्दतीने लागवड केलेल्या आंबा बागेमध्ये जुन्या अनुत्पादित झाडांची मध्य फांदी छाटणी व इतर मध्यम फांद्यांची विरळणी करावी. खूप जुन्या आणि उंच झाडांची छाटणी बुंध्यापासून दोन तृतीयांश उंचीवर करावी व कमी वयाच्या आणि कमी उंचीच्या झाडांची छाटणी १२ ते १५ फुट उंचीवर करावी. छाटणी केलेल्या झाडांवर क्लोरोपायरीफॉस कीटकनाशक ५ मि. ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणात संपूर्ण झाडावर फवारून झाड भिजवून घ्यावे तसेच कीटकनाशकाचे द्रावण छाटणी केलेल्या झाडांच्या मुळांमध्ये देखील ओतावे. त्यानंतर १ लिटर डांबराच्या द्रावणामध्ये ५ ग्रॅम बाविस्टीनची भुकटी मिसळून कापलेल्या फांद्यांच्या भागावर लावावे. छाटणी केल्यानंतर सुरुवातीच्या काळात झाडाला १० ते १५ दिवसांच्या अंतराने १५० ते २०० लिटर पाणी द्यावे. नवीन फुटवे आल्यानंतर दोन आठवड्यांनी ३ ते ५ फुटवे ठेवून नवीन फुटव्यांची विरळणी करावी. पहिली विरळणी केल्यानंतर, छाटणी केलेल्या भागापासून खाली फुटवे येण्यास सुरवात झाल्यावर दर एक फुटावर एक याप्रमाणे खोडाच्या सर्व बाजूला फुटवे ठेवून इतर फुटवे काढून टाकावेत. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • पाऊसाची उघडझाप आणि तापमानात वाढ संभवण्याची शक्यता असल्याने, काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या (टी मोस्कीटो बग) किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. कीड पालवीतील रस शोषून घेते त्यामुळे नवीन पालवी सुकून जाते. नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. (टीप: किटकनाशकास लेबल क्लेम नाहीत.).<br>• काजू बागेतील गवत, रोगग्रस्त फांद्या काढून बागेची साफसफाई करावी आणि नंतर कीटकनाशकाची फवारणी घ्यावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • नारळावरील इरीओफाईड कोळीच्या प्रादुर्भावामुळे फळाच्या देठाखालच्या भागात पांढरट, पिवळे, त्रिकोणी चट्टे दिसून येतात व नंतर चट्टे वाढत जाऊन त्रिकोणी आकाराचे होतात. प्रादुर्भित भागावरील फळांचे आवरण तडकते परिणामी नारळ लहान राहतात तसेच लहान फळांची गळ होते. किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के कडूनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. समप्रमाणात पाण्यात मिसळून मुळाद्वारे ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत. याशिवाय नारळावर १ टक्का कडुनिंबयुक्त कीटकनाशक (निमाझोल) ४ मि. ली. प्रतीलिटर पाण्यातून नारळाच्या घडावर पडेल अशी फवारणी करावी. फवारणी करण्यापूर्वी सर्व किडग्रस्त व तयार नारळ काढून घ्यावेत. पडलेले फळे, फुलोरा गोळा करून नष्ट करावेत. |
| **भाजीपाला पिके** | **पेरणी** | • रब्बी हंगामासाठी वांगी, मिरची, टोमेटो आणि इतर भाजीपाला पिकाची रोपे तयार करण्याकरिता जमीन वाफसा स्थितीत असताना मशागत करावी. वाफे तयार करण्याअगोदर जमिनीत चांगले कुजलेले शेणखत ५०० किलो प्रति गुंठा मिसळावे. ३ मी. लांब x १ मी. रुंद x १५ से.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावे. पेरणीच्या वेळेस गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून १० सें.मी. अंतरावर ओळीने भाजीपाला बियाणांची पेरणी करावी. पेरणी करण्या अगोदर बियाण्या द्वारे पसरणाऱ्या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी बियाण्यास थायरम ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे किंवा ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करतेवेळी किंचित पाणी लावून जैविक बुरशीनाशकाचे पातळ आवरण बियाण्याभोवती होईल असे पहावे. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | **-** | • क्रायमिन कॉंगो हेमोरायजिक फिवर या विषाणूजन्य रोगाचा प्रसार जनावरांना गोचीडापासून होण्याची शक्यता असल्याने जनावरांच्या गोठ्यात स्वच्छता राखावी तसेच गोचीड नियंत्रणासाठी पशू वैद्यकांचा सल्ला घेवून उपाय योजना कराव्यात.<br>• फुलोऱ्यावर असलेल्या हिरवा चाऱ्याची मुरघास पद्धतीने साठवण करावी. यासाठी प्रत्येकी १०० किलो बारीक तुकडे केलेल्या गवतावर ५ ते ६ लिटर पाण्यामध्ये तयार केलेले द्रावण (२ कि. गूळ + अर्धा कि. युरिया + १ कि. मीठ) शिंपडावे. प्रक्रिया केलेल्या गवताचे थर रचून बाजारात सहज उपलब्ध असलेल्या प्लास्टिक सायलो पूर्ण भरावेत. पाउस आणि उष्णते पासून संरक्षणासाठी सायलो शेड मध्ये ठेवावेत. अशा पद्धतीने २-३ महिन्यामध्ये मुरघास जनावरांना खाण्यासाठी तयार होतो. |
| **कुकुटपालन** | **-** | • मांसासाठी आणि अंडी उत्पादनासाठी नवीन पक्षी पाळण्यासाठी योग्य कालावधी असल्याने पिल्लांची उपलब्धता करावी. पिल्ले अंड्यातून बाहेर पडल्यानंतर सहाव्या आठवड्यापर्यंत त्यांना योग्य तापमानाची आणि संरक्षणाची गरज असते त्यासाठी पिल्ले आणावयाच्या आधी ब्रुडर तयार करून ठेवावे. ब्रुडरचे तापमान साधारणत: ३० ते ३५ अंश सेल्शियस असे ठेवावे. पिल्ले आणल्यावर त्यांना ब्रुडर मध्ये ठेवून पसरट भांड्यामध्ये भरडलेला मका द्यावा तसेच पाण्याचे पसरट भांडे ठेवावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**